सायबर सेल, पिंपरी चिंचवड
पोलीस आयुक्त कार्यालय, पिंपरी चिंचवड,
प्रेमलोक पार्क, चिंचवड, पुणे
दुरध्वनी क्रंमाक ०२०-२७३५०१२०

प्रेसनोट | पिंपरी चिंचवड | दिनांक - ०६/०८/२०२४

# शेअर मार्केट ट्रेडिंगमध्ये गुंतवणुकीचे बहाण्याने ऑनलाईन २० लाख रुपयांची फसवणुक करणारे आरोपीस सायबर सेलकडुन उल्हासनगर येथुन ताब्यात घेवुन गुन्हा उघड

किवळे येथे राहणारे तक्रारदार यांचे इन्स्टाग्रामवर आरोपी यांनी Geojit Financial Securities Limited या कंपनीची ट्रेडींगची लिंक पाठवुन त्याव्दारे फिर्यादी यांना व्हॉट्सअप ग्रुपमध्ये जॉईन करण्यात आले. त्याग्रुपवर सदर कंपनीस सेबीची मान्यता असुन सदर कंपनीचे प्लॅटफॉर्मवरुन व त्यांचे सांगण्याप्रमाणे शेअर ट्रेडींग केल्यास चांगला फायदा मिळवुन देण्याचे अमीष दाखवुन व खात्री देवुन तक्रारदार यांचा विश्वास संपादन करुन वेगवेगळे शेअर ट्रेडींगच्या नावाने वेगवेगळया बँक अकाऊंटवर एकुण २०,२४,०००/- रु. भरण्यास भाग पाडुन फसवणुक केल्याने तक्रारदार यांनी प्रथम ऑनलाईन तक्रार केली व त्यानंतर देहुरोड पोलीस ठाण्यास सदरबाबत तक्रार दिल्याने देहुरोड पो.स्टे. गु.रजि.नं. ३६९/२०२४ भा.द.वि.कलम ४०६, ४२० सह माहिती तंत्रज्ञात कायदा २००० चे कलम ६६(सी) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला होता.

सदर गुन्हयाचा वरिष्ठांचे आदेशाने सायबर सेलकडुन समांतर तपास चालु असताना आरोपी याने गुन्हा करण्यासाठी वेगवेगळया बँक अकाऊंटचा वापर केला असल्याचे त्यामधील अकाऊंटधारक हा उल्हासनगर, ठाणे येथील असल्याची तांत्रिक माहीती प्राप्त झाली त्यामुळे तात्काळ वरिष्ठांचे परवानगीने सायबर सेलकडील सपोनि सिमा मुंढे, पोलीस अंमलदार अतुल लोखंडे, सौरभ घाटे, प्रिया वसावे असे पथक तपासकामी ठाणे, मुंबई येथे पाठविले असता त्यांनी आरोपी यांनी गुन्हयासाठी वापरलेले बँक अकाऊंट धारकाचा शोध घेवुन त्याच्याकडे तपास केला असता त्याने सदरचे अकाऊंट हे त्याचे ओळखीचे इसम नामे अजयकुमार किशनलाल आर्या रा. उल्हासनगर, ०४ नं ओटी मेन चौक, उमंग हॉस्पीटल - ४२१००४ यास दिले असल्याचे सांगितले त्यावरुन तात्काळ सदर त्याचा शोध घेवुन त्याचेकडे तपास केला असता त्याने सुरुवातीला उडवा उडवीची व असमाधानकारक उत्तरे दिल्याने त्यास ताब्यात घेवुन सायबर सेल येथे आणुन त्याचेकडे अधिक विश्वासात घेवुन कौशल्यपुर्वक तपास करता त्याने त्याचा साथीदार परमान साजीद अली खान व निखिल सेलवानी यांचे सांगण्यावरुन सदर बँक अकाऊंट घेवुन त्यांना देवुन त्याबदल्यात मोबदला घेतला असल्याचे तसेच स्वतःचे कोटक बँक अकाऊंट नं. ८३४७२५००७२ यावर वेळोवेळी फ्रॉड रक्कम घेवुन प्राप्त केलेल्या वेगवेगळया बँकेच्या कार्डवरुन वेळोवेळी एटीएम मधुन पैसे काढुन त्यांना दिले असल्याचे सांगुन सदरचा गुन्हा साथीदार निखील सेलवानी व परमान साजीदअली खान यांच्यासह केल्याची कबुली दिली आहे. सदर गुन्हयात त्याचा सक्रिय सहभाग निष्पन्न झाल्याने त्यास ताब्यात घेवुन पुढील तपासकामी देहुरोड पोलीस ठाणे यांचे ताब्यात देण्यात आले आहे. इतर पाहीजे आरोपी व आरोपींने वेगवेगळया बँक अकाऊंटवर फ्रॉड रक्कम घेतली असल्याने त्याचा तपास चालु आहे.

सदरची कारवाई मा. पोलीस आयुक्त पिंपरी चिंचवड - श्री.विनयकुमार चौबे, मा. सह पोलीस आयुक्त- श्री. डॉ. शशिकांत महावरकर, मा. अपर पोलीस आयुक्त- श्री. वसंत परदेशी, मा. पोलीस उप आयुक्त, गुन्हे - श्री. संदिप डोईफोडे, मा. सहायक पोलीस आयुक्त, गुन्हे १ - श्री. डॉ. विशाल हिरे, पिंपरी चिंचवड यांच्या मार्गदर्शना खाली पोनि. रविकिरण नाळे, सपोनि. प्रविण स्वामी, सपोनि. सिमा मुंढे, पोउपनि सागर पोमण, पोलीस अंमलदार प्रिया वसावे, अतुल लोखंडे, सौरभ घाटे, दिपक भोसले, नितेश बिचेवार, श्रीकांत कबुले, स्वप्निल खणसे, कृष्णा गवळी, विशाल गायकवाड, बळीराम नवले, अभिजीत उकिरडें सर्व नेमणुक सायबर सेल यांच्या पथकाने केली आहे.

**(संदिप डोईफोडे)**
पोलीस उप-आयुक्त, गुन्हे,
पिंपरी चिंचवड.